लोकमत

# सहकार क्षेत्रात जीवन बदलण्याची क्षमता

## विजय कुमार : वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थेचा स्थापना दिवस उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** देशातील ९० टक्के गावांमध्ये सहकार क्षेत्र पोहोचले आहे. तळागाळातील शेतकऱ्यांना कमी किमतीत कृषी पतपुरवठा करण्यात सहकारी संस्था महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. काही सहकारी संस्थांच्या यशोगाथा जगभर प्रसिद्ध आहेत. कोट्यवधी शेतकरी, कारागीर, मच्छीमार, मजूर आणि सर्वसामान्यांचे जीवन बदलण्याची क्षमता सहकार क्षेत्रात आहे, असे मत भारत सरकारचे अतिरिक्त सचिव विजय कुमार यांनी व्यक्त केले.

वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थेचा (वैमनिकॉम) ५५वा स्थापना दिवस नुकताच साजरा झाला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सहकार मंत्रालयाचे सचिव डी. के. सिंग तसेच ऑस्ट्रियातील व्हिएन्ना येथील सेंट्रल युरोपियन युनिव्हर्सिटीच्या अध्यक्षा डॉ. शालिनी रंधेरिया या कार्यक्रमाला सन्माननीय अतिथी, तर वैमनिकॉमच्या संचालिका हेमा यादव उपस्थित होते.

डॉ. हेमा यादव म्हणाल्या की, स्वातंत्र्याच्या ७५व्या वर्षी संस्थेचा ५५वा स्थापना दिवस साजरा केला जात आहे. वैमनिकॉमचा उद्देश शिक्षणाद्वारे सहकारी चळवळीला चालना देणे आहे.

तसेच व्यावसायिक आणि शैक्षणिक संस्था म्हणून स्वत:ला प्रस्थापित करण्यात सक्षम झाली आहे.

डॉ. शालिनी रंधेरिया म्हणाल्या, की वैकुंठ मेहता हे भारतीय सहकार चळवळीचे शिल्पकार म्हणून स्मरणात राहतील, त्यांनी सहकारी विचारधारा आणि पद्धतींमध्ये काही नवनवीन शोध सुरू केले आणि भारतीय परिस्थिती व पर्यावरणाला अनुसरून च्या आंतरराष्ट्रीय सहकारी चळवळ पुढे नेली.

डी. के. सिंग म्हणाले, की सरकारने सहकार मंत्रालयाची स्थापना केल्याने देशातील सहकार चळवळीला नवी दिशा मिळेल. सहकारातील नीतिमत्तेची भूमिका आजच्या परिस्थितीत अतिशय महत्त्वाची आणि समर्पक आहे, जिथे संस्थेने प्रशासनात नीतिमत्ता, अखंडता आणि लोकशाही तत्त्वांना महत्त्व दिले पाहिजे.